"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : ०२२ – ४७४९ ८२५९
**WEB SITE** : **http://www.nkgsbsangh.org**
**E-MAIL** : **nkgsbs@gmail.com**
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

**।। नास्ती धीमताम् अविषयो नाम ।।**

मूल्य रु. ५

**क्रमांक ४ वर्ष : ४६ जानेवारी–मार्च २०२५**

**BOOK PACKET**
Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

हे वर्ष तुम्हा सर्व ज्ञातिबांधवांना सुखाचे समृद्धीचे व भरभराटीचे जावो ही मंगेश–शांताई चरणी नम्र प्रार्थना!

## तिळगुळ समारंभ – भगिनीस आमंत्रण

नेहमीचा मकर संक्रांत समारंभ यंदाही ठाणे व माहीम येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळात वेळ काढून आपल्या लेकी सुनांसह अवश्य यावे ती विनंती.

**माहीम**

शनिवार दिनांक १८ जानेवारी २०२५.
संध्याकाळी ४.३० ते ६.३०
पत्ता : फ्लॅट १३०५, १३ वा मजला,
लँड स्केप मिराज टॉवर, रिलायन्स स्मार्ट बजारच्या बाजूला, माटुंगा रोड स्टेशन समोर, सेनापती बापट मार्ग, माटुंगा पश्चिम.
संपर्क: सौ. आरती गायतोंडे ९२२४५०१८४४
व सौ. स्मिता कुलकर्णी ८८९८०१५४६६.

**ठाणे**

मंगळवार दिनांक २१ जानेवारी २०२५
संध्याकाळी ४ ते ७
सौ. सुरेखा पालेकर यांच्या घरी
७, दीप दर्शन, सहयोग मंदीर पथ, नौपाडा, ठाणे
मोबाईल : ९०८२६६२०१९
संपर्क: सौ. ज्योती सुखटणकर
सौ. सुरेखा पालेकर
श्रीमती अश्विनी वाघ

## संपादकीय

नवीन वर्षाच्या शुभेच्छा. आपल्या संघाला व एज्युकेशन सोसायटीला सातत्याने मिळणाऱ्या देणग्यांचा ओघ ज्ञातीला अभिमानास्पद आहे. अशा प्रकारच्या रकमेच्या देणग्यांचा विनियोग कसा योग्य प्रकारे केला जातो हे थोडक्यात सांगतो.

सगळ्या देणग्यांची रक्कम समाजसेवेसाठी म्हणून CORPUS मध्ये समाविष्ट केली जाते व वेळोवेळी ठेवीच्या रुपाने ती बँकांमध्ये गुंतवली जाते. ठेवींवर मिळणाऱ्या व्याजातूनच गरजूंना आर्थिक साहाय्य पुरवले जाते. वैद्यकीय साहाय्य, वृद्ध सेवा वगैरेंना ही रक्कम दर महिना दिली जाते.

दिवसेदिवस वाढणाऱ्या महागाईमुळे या साहाय्यामध्ये सतत वाढ करीत राहणे जरुरीचे असते व त्यासाठी देणग्यांचा ओघही कायम असावा लागतो. आम्ही त्यासाठी प्रयत्नशील आहोत. ज्ञातिबांधवही आम्हाला उदार हस्ते सहकार्य करतील असा आम्हाला विश्वास आहे.

– **प्रसाद (पंकज) मोहन कसबेकर** – संपादक

## प्रकाश झोत–१



We are proud to share that Kavya has secured the 1st place in the CISCE National Games for Artistic Gymnastics in Girls Under 14 category. She has shown an amazing all round performance with 3 golds and becoming the overall champion in her age group across all ICSE schools. She now shall represent ICSCE schools in the SGFI National Games to be held in December 2024

She won gold medals in gymnastics and selected for national level.
She is grand daughter of late Shrinivas Desai Thane.
Her name is **Kavya Aparna Prashant Choudhary.**


## प्रकाश झोत–२

### 'माझ्दा आर्ट फेस्टिव्हल'मध्ये वृंदा पै यांना प्रथम पारितोषिक'

पणजी, ता. २३ : २०, २१, २२ सप्टेंबर या तीन दिवसीय भरलेल्या 'माझ्दा आर्ट फेस्टिव्हल' या चित्रप्रदर्शन आणि चित्रस्पर्धेत ५० मास्टर, आर्टिस्ट आणि २०० नवोदित चित्रकारांची एकूण २५० पेक्षा अधिक चित्रे मांडण्यात आली होती. यात वृंदा पराग पै (मुंबई) यांना हैद्राबाद येथील चित्रामयी स्टेट गॅलरी ऑफ आर्ट येथे आयोजित 'माझ्दा आर्ट फेस्टिव्हल' या राष्ट्रीय स्तरावरील कला महोत्सवात २५,००० रुपयांचे पहिल्या क्रमांकाचे बक्षीस आयपीएस अधिकारी अंजना सिन्हा यांच्या हस्ते प्राप्त झाले.

वृंदा पराग पै या मूळच्या म्हापसा येथील असून, त्या न्यू गोवा हायस्कूल आणि सेंट झेवियर्स महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी आहेत. त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्या लेखिका मीरा निशीथ प्रभू वेर्लेकर यांच्या ज्येष्ठ कन्या आहेत.






## प्रकाश झोत–३



### नीलेश तेलंग हे कारवारच्या सुप्रसिद्ध गुणा तेलंगाचे नातू आहेत

Nilesh Telang has been selected for inclusion in Marquis Who's Who. As in all Marquis Who's Who biographical volumes, individuals profiled are selected on the basis of current reference value. Factors such as position, noteworthy accomplishments, visibility, and prominence in a field are all taken into account during the selection process.

Mr. Telang is a senior principal software engineer at Palo Alto Networks Inc., a multinational cybersecurity company headquartered in Santa Clara, California, where he has been contributing his expertise since 2021. With a robust background in software engineering, he has demonstrated exceptional proficiency in coding and innovative design, earning recognition for his ability to resolve critical defects and develop impactful solutions.Before joining his current organization, Mr. Telang served as an SDE III at Amazon in Sunnyvale, California, from 2019 to 2021. His tenure at Amazon was marked by significant contributions to developing scalable and efficient software systems. Mr. Telang also succeeded as a software engineer at Google in Mountain View, California, between 2012 and 2015, where he played a pivotal role in enhancing the performance and reliability of various Google services.




---

### ज्ञातिबांधवांचे स्नेहसंमेलन २४ नव्हेंबर २०२४

सालाबादप्रमाणे यंदाही भरलेले आपल्या ज्ञातिबांधवांचे स्नेहसंमेलन २४ नव्हेंबर २०२४ रोजी मोठ्या थाटामाटात व उत्साहाने पार पडले. प्राचार्य बी एन्. वैद्य सभागृहात जवळ जवळ १२५ च्या वर प्रेक्षकांनी हजेरी लावली. या वेळचा उत्साह प्रेक्षकांमध्ये दांडगा एवढ्याच साठी ठरला त्याला कारण प्रमुख पाहुणे म्हणून आलेले पद्मश्री उदय विश्वनाथ देशपांडे, ते आपल्या सुविद्य पत्नी सुखदा उदय देशपांडे सह आले होते. तसेच त्यांचे १७ मुली व १५ मुले ही ३२ जणांची भक्कम टीम इथे मल्लखांब व दोरीवरच्या कसरतींचे प्रात्यक्षिक दाखविण्यास सज्ज होती! पद्मश्री उदय देशपांडेंचा परिचय या आधीच्या मुखपत्रिकेत विस्ताराने दिलेलाच आहे. यंदाच्या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रसाद कसबेकर यांनी छान रितीने हाताळले. सुरुवात श्रीमती प्रज्ञा वागळे यांच्या सुमधुर स्वागत गीताने झाली. नंतर नेहमीच्या

प्रथेनुसार व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. तद नंतर निधन पावलेल्या ज्ञातिबांधवांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्तब्धता पाळून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

यानंतर ज्ञातीतर्फे संघ अध्यक्षांनी प्रमुख पाहुण्यांना पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला. तसेच प्रमुख पाहुण्यांच्या पत्नी सौ. सुखदा यांना एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांनी पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव केला. संघाचे अध्यक्ष मारुती दळवी व एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष देवदास नाडकर्णी यांनी आपापल्या संस्थांच्या गेल्या वर्षी ठळक घटनांचा आढावा घेतला. यानंतर संघाचे उपाध्यक्ष शिरीष वाघ यांनी उपस्थितांना प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली.

प्रमुख पाहुणे पद्मश्री उदय विश्वनाथ देशपांडे यांनी अत्यंत सहज व सोप्या रितीने आपले विचार मांडले. लहानपणापासून मल्लखांबाची आवड कशी निर्माण झाली इथपासून ते आज जगभर ५० च्या वर देशांत पसरलेला त्यांचा पसारा पहाता अचंबित व्हायला होते. अनेक युरोपीय तसेच आशिया खंडातील देशांमध्ये त्यांच्या मल्लखांबाच्या शाखा आहेत व तेथील युवकच नव्हे तर स्त्रीया, वयस्क असे अनेक प्रकारचे शिष्य त्यांनी देशादेशात तयार केले आहेत व अहोरात्र करत आहेत. ही त्यांची जिद्द वाखाणण्याजोगी आहे. मल्लखांबाला ऑलिम्पिकमध्ये स्थान मिळावे यासाठी त्यांची मनापासून धडपड चालू आहे. इथे आलेल्या १७ मुली, मग त्या १० वर्षे वयापासून २५ वर्षे वयाच्या तसेच १५ मुले ही ९ वर्षे वयापासून ५३ वर्षे वयस्कांपर्यंत होती व त्या सर्वांनी विविध प्रकारे दोरीवरील तसेच मल्लखांबावरील प्रात्यक्षिके दाखवून जवळ जवळ १ तास सर्व प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून सोडले. त्या आधी सर्वांसाठी चहा पाण्यासाठी १० मिनिटे विश्रांती देण्यात आली. इतके सगळे असून सुद्धा पद्मश्री उदयजी आजही अतिशय साधे व मिळून मिसळून वागणारे असे गृहस्थ पाहून सर्वांचा ऊर भरून आला.

त्यांना ९ वाजता अरुणाचल प्रदेशला विमानाने जायचे होते तरी जवळ जवळ ७ वाजेपर्यंत ते आम्हां सर्वात सहजतेने मिसळले हे आमचे थोर भाग्य!

त्यांच्या प्रात्यक्षिकांनंतर त्यांच्या पत्नी श्रीमती सुखदा यांच्या तर्फे प्राविण्य मिळालेल्या विद्यार्थी विजेत्यांना उत्तेजनार्थ बक्षीसे प्रदान करण्यात आली. तसेच आपल्या संघातर्फे त्यांच्या ३२ जणांच्या चमूचा 'प्रत्येकी' सत्कार करण्यात आला.

अरुण वाघ यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर रंगमंचावर मुलांकडून राष्ट्रगीत म्हटले गेले व ज्ञातिबांधवांना उपहार बॉक्सेस देऊन कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली. (वामन नाडकर्णींनी टेम्पो करून त्यांच्या मुलांची तसेच मल्लखांब वगैरेची ने आण करण्याची चोख व्यवस्था पार पाडली.)

**– प्रसाद कसबेकर**



## गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना बक्षिसे व इतर गुणवत्ताधारक बक्षिसे २०२४-२०२५

## *मेरीट प्राइझेस २०२४-२०२५*

| | | | |
|---|---|---|---|
| **HSC सायन्स** | - HS-01 | तीया प्रसन्न कामथ | ८५.८३% |
| | - HS-02 | सुमिरा हर्षद पंडित | ८५.५०% |
| **HSC कॉमर्स** | - HS-01 | कुणाल कृष्णा भट | ८४.८३% |
| **HSC आर्टस्** | - HA-01 | निकीता अमीत पाटकर | ८७.७७% |

## *पोस्ट ग्रॅज्युएटस मेरीट प्राइझेस - २०२४-२०२५*

**PG-01** **यशश्री गजानन वागळे** **MBA(HR)**

## *OTHER ACHIEVEMENTS PRIZES 2024 – 25*

| | | |
|---|---|---|
| **स्वरा सुशांत पालेकर** | – | National Level Interschool Classical Dance Competition - 19th Rank in Kathak |
| **हर्ष गौतम वागळे** | – | Won 2 Bronze medals in All India Championship of Martial Arts organised by Khel Karate **Premier League** |
| **काव्या प्रशांत चौधरी** | – | All-Round Champion In Artistic Gymnastics In National Games 2024 |
| **तन्वी संतोष पत्की** | – | Akhil Bharatiya Gandharva Mahavidyalaya Bharatanatyam Competition 1st Rank |
| **माही संतोष पत्की** | – | Akhil Bharatiya Gandharva Mahavidyalaya Vocal Competition 2nd Rank |
| **शमीका यतीन जोशी** | – | 1st in Sub Junior Rhythmic Gymnastics National Championship 2023-2024 |

## *मेरीट प्राइझेस* SSC २०२४–२०२५

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | **SC-01** | **गौरव समीर आरस**<br>स्पे. अचीव्हमेंट | **SSC**<br>वॉर्ड | ९७.८०% |
| २. | **SC-02** | **शौनक समीर पंडित**<br>स्पे. अचीव्हमेंट | **ICSE**<br>वॉर्ड | ९७.३३% |
| ३. | **SC-03** | **पार्थ गुरुदत्त कसबेकर** | **ICSE** | ९७.००% |
| ४. | **SC-04** | **अनीश कृष्णा कामत** | **ICSE** | ९६.८०% |
| ५. | **SC-05** | **शंतनु समीर कसबेकर** | **ICSE** | ९५.००% |
| ६. | **SC-06** | **ऋत्विक अविनाश पै** | **ICSE** | ९४.१७% |
| ७. | **SC-07** | **चिन्मय गिरीष नाडकर्णी** | **SSC** | ९३.००% |
| ८. | **SC-08** | **तनीश नीळकंठ मणेरीकर** | **SSC** | ९१.८०% |
| ९. | **SC-09** | **भावीनी मिलींद घोटींग** | **SSC** | ९१.४०% |
| १०. | **SC-10** | **अमेय रामचंद्र सोहोनी** | **SSC** | ९१.२०% |
| ११. | **SC-11** | **संतृप्ती अविनाश हसवाडकर** | **SSLC** | ८५.२०% |
| १२. | **SC-12** | **अर्णव राहूल रेगे** | **ICSE** | ८३.००% |
| १३. | **SC-13** | **मन्या गणपती प्रभू** | **SSC** | ८०.००% |

## GRADUATE MERITS PRIZES 2024 – 25

| | |
|---|---|
| **वेदा बाळकृष्ण पालेकर** | **BA - 83.95%** |
| **सुरज सतीश कामत** | **Project Management Professional Certificates** |

### ७५ वर्षे वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना स्मृतिचिन्हे देण्यात आली त्यांची नावे (वर्ष २०२४–२०२५)

| नांव | रहाण्याचे ठिकाण |
|---|---|
| १) यशवंत शिवराव आरस | ग्रँटरोड |
| २) प्रमोद मारूति बोरकर | फोंडा |
| ३) प्रमोद गोविंद बोरकर | गिरगाव |
| ४) श्रीमती सुधा मारूति दळवी | मुलुंड |
| ५) प्रसाद मोहन कसबेकर | मालाड |
| ६) श्रीमती शिवांगी उल्हास नाडकर्णी | कांदिवली |
| ७) महारुद्र भालचंद्र पालेकर | ग्रँटरोड |
| ८) श्रीमती शुभदा दिलीप फेणे | माहीम |
| ९) शांताराम विनायक पिकळे | जोगेश्वरी |
| १०) रजनीकांत शिवानंद तेलंग | जोगेश्वरी |
| ११) श्रीमती स्नेहलता विनायक तेलंग | बंगलूर |
| १२) सुधीर रामकृष्ण वाघ | माहीम |
| १३) शिरीष दिनानाथ वाघ | दहीसर |
| १४) श्रीमती रीना अविनाश वाघ | माहीम |
| १५) श्रीमती अनुसुया अनील मजली (पूर्वाश्रमीची श्रीमती कसबेकर) | कारवार |

### विवाहाचा सुवर्णमहोत्सव गाठणाऱ्या जोडप्यांना २०२४–२०२५ वार्षिक स्नेहसंमेलनात स्मृतिचिन्हे देण्यात आली. त्यांची नावे:

| नाव | ठिकाण |
|---|---|
| १) श्रीमती मंगला व श्री मंगेश गणपतराव गायतोंडे | बोरीवली |
| २) श्रीमती प्रभा व श्री मनोहर बालकृष्ण पालेकर | कांदिवली |
| ३) श्रीमती सीतादेवी व श्री शांताराम विनायक पिकळे | जोगेश्वरी |
| ४) श्रीमती शोभा व श्री रघुनंदन काशिनाथ वागळे | दहीसर. |




MSIPL
We Make People Richer

Mangsidesh Investment Pvt Ltd
AMFI-Registered Mutual Fund Distributor
402, Business Point, Paliram Road, Off S. V. Road, Behind Brahma Kumari Hosp., Andheri (West), Mumbai 400 058
Contact No. 022 4233 2300 to 2399, +91 91672 20380

Invest in Your Future with Confidence

**Benefits to Invest in Mutual Fund:-**
1. Diversified portfolio to manage risk
2. Professional fund management expertise
3. Variety of asset classes (equity, debt, hybrid, index, ETFs)
4. Liquidity and flexibility
5. Potential for higher long-term returns




**Grow your wealth with our expertly managed Mutual Funds**

A little every month grows to something significant over time..

Invest Rs. 1,000/- Per month & get ..

| Investment Years | Total Investments | Growth rate 8% | Growth rate 12% | Growth Rate 15 % |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 275,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |

Indian Equity market has given average 16% returns in last 33 years

Mutual Fund Investments are subject to market risk, Read offer documents carefully before Investing.



## LATE CA DURGARAO KRISHNRAO BORKAR (DKB) A KARMYOGI

Late CA Durgarao Krishnarao Borkar (DKB) was the Founder of Borkar Muzumdar Chartered Accountant Firm.

He was also a Trustee of our Education Society.

He was also active member in Renovation of 400th year of Shantadurga Temple, Kavale, Ponda, Goa.

Shri. Durga Krishnarao Borkar (D X Borkar Nee DKB) - my grandfather, was an eminent and respected personality. A Chartered Accountant, founder member of a CA firm Borkar & Muzumdar, Vice chairman of NKGSB bank and Trustee for many charitable associations including NKGSB Sangh, Shree Shantadurga Sasthan committee.

He hailed from a small village called Chendiye near Karwar, Karnataka State born in 1901. He completed his school education over there. He came to then Bombay to study further and pursue his career in Accountancy, did apprenticeship with reputed Accountancy firm A F Fergusons. He was married to Late Smt. Ambakaa Palekar from Todur and had 3 children. Late CA Vasant Borkar, Mrs Shaila Shanbhag & Mrs. Jyotsna Telang. His wife passed away at a quite young age in 1947. After that, he lived a life of a Karmyogi. He fulfilled all his responsibilities towards the family, society and especially our GSB community-equally without considering any personal benefit. Once he had committed himself to any task-be it a career or social work, he used to complete it with zest and going out of his way. He always put his career and other social work ahead of his own personal life. In society he got nickname as DK Or Durgamam,

He was chief accountant which is equivalent to today's CFO position of prestigious cement company ACC. The Major milestone during his career was mergers and acquisition of all small cement companies scattered throughout India into a single company - which was later named as Associated Cement Company (ACC). He had travelled expanse of undivided India and mentioned to me his visits to Karachi-Pakistan, which was part of India then.

He was founder member of the prestigious firm of Chartered Accountant Borkar and Muzumdar which was formed in 1944. The goodwill he had carried through his career culminated into vast clientele to the firm. This firm was the first one started its branch in Independent Goa and my father had played crucial role in the same along with him. The main facet of his personality was trustworthiness. The clients always counted on him for all major decisions in their financial matters. As a meticulous person, who being as a tax consultant always advised his clients to be transparent with the government. I had overheard he advising a client who was arguing with him asking why should I pay correct tax? DKB's answer was "...So that you can have a sound sleep in night." DKB always believed in contesting the dispute with income tax authorities in in legal ways and not otherwise.

His professional capabilities and accolades are well known and till today I come across many people who has praised him for the same. He was so dedicated towards work that he was attending office daily from 11 to 6 pm till his age of 84. He knew each and every client's case by heart and could give references of each client's file stating the page numbers.

Emancipation of GSB community was his moto and mission, he mentored young



intelligent boys from our community from the Karwar village. When they used to arrive in Mumbai, they used to stay in his house and establish themselves in the life. I remember, so many young members of community used to come to him for his recommendation letter for job and he went out of the way to help them out.

He always had philanthropic mind-set and went out of the way to help all the strata of society who were in need be it from the community and otherwise.

One such incidence, which was mentioned by our relative is as follows: One of our relatives staying in Karwar, Karnataka had invested in a blue-chip share on DKB's advice, later he asked DKB to sell those company shares as he was in need of money. DKB affirmed and sent him the equivalent money to him. However, later that relative received dividend on these shares... so being confused and surprised - he called DKB asking how come, he received the dividend when the shares were sold. At that time DKB told him that the shares were not sold as he knew that the it was a good investment. DKB sent him money on his need from his own pocket. Later, the relative returned the due money. This incidence was shared to us by the relative's daughter but never ever shared at home by DKB. This shows the far-sightedness and kindness possessed by him.

Another such incidence I remember in 1970s one poor person an istriwala who used to iron his clothes was suffering from a severe cold and cough and doctor has asked him to do further Investigations. That poor guy did not have money for the undertaking further medical tests. DKB personally took him to the hospital and sponsored all his tests and medicines till he became fit and fine.

I remember in my childhood, our annual visit to the Circus where he used to take along not only his grandchildren but all children from the near family. We used to be al test 15 to 20 children. It used to be a big event for all of us for him it was like - "हे विश्वची माझे घर।'

DKB was a very honoured personality for the world but for me, he was my dear Kaka Ajoba. His day used to begin with a prathana in front of Devi, then morning walk in Shivaji Park Chowpatty for an hour or so & then attending office for whole day. He used to return home in evening. He was so humble that after attending office for the whole day and coming back home late evening - he used to spend time with me and we together used to sing Abhanga and Hari path and storytelling form Ramayana and Mahabharata. In night he used to sing me lullaby. I recall the Lullaby "सुतार उत्तम सा तुजसाठी आणविला......

He was actively involved in many of community initiatives, thus almost all weekends were dedicated to social work. I He was like a university in himself and I being his grand-daughter I was lucky to witness these facets closely.

I was blessed as he taught me first steps of accountancy in my young age. He gave me practical experience by allowing me to writing his personal books of accounts. Those all-personal ledgers are still preserved by me as a treasure. Later, when I myself became Chartered Accountant and went through those ledgers once again - I came to know that he has financed to many needy persons by providing interest free loans for their business or for their personal needs.

He stood behind all such needy persons-like a solid rock & a Light House!

DKB passed away on 9 th June 1985 when I was just 21 years old, I am sure he would have been very proud if he would have lived to witness me become a Chartered Accountant in 1989: a rare scenario of third generation of family to become CA as Late V D Borkar my father was also CA.

The legacy and goodwill DKB had created throughout his life is just phenomenal and I don't think I have been able to cover them all in the article. It's my small effort to write down this article as a tribute to his tall personality.

**CA Manisha Borkar** - Mob. 9820686972, Email-mvborkar@gmail.com

# कुठं हरवलं माझं 'ते' कारवार ?

बाहेर पावसाची आधी मनात आठवणींची रिमझिम चाललीय. या दोन्ही रिमझिमी मिळून माझ्या डोळ्यातूनही अश्रूंची रिमझीम सुरू करतात. निसर्ग, मन आणि डोळे यांचं असं काही सख्य आहे की एक बरसू लागलं की इतरांचंही तेच सुरू होतं. असं होण्याला कारण ठरलेले एकच ठिकाण. ते म्हणजे माहेरगाव.

माहेर हा प्रत्येक स्त्रीचा 'विक पॉईंट' असतो. ठराविक फुला-फळांचा जसा ठराविक मोसम असतो, तसाच मला वाटतं मनात आठवणींची जागा भरण्यालाही पावसाळा हाच मोसम असावा. कारण, या वर्षाळू वातावरणात भावनाही ओल्या चिंब होतात. बाहेर सरीवर सरी आणि आठवणींचे अंकुर फुटतात उरी, असं हे समीकरण असतं. 'गेले ते दिन गेले' ही पंक्ती व्याकुळच करते मनाला.

आम्ही लहानाचे मोठे झालो. कारवारने पूर्णपणे कात टाकलेली आहे, आमचं कारखार ते हेच का असे वाटण्याइतपत! आज, ते प्रसिद्धी, प्रगती, कीर्ती मिळवून शहरी रुपात मोठ्या दिमाखात उभं आहे. अभिमान आहेच त्याचा, पण खरं सांगू का? माझं 'ते' साधेसुधं कारवार हरवल्याची खंत आजही जीवंत आहे. नैसर्गिक सौंदर्य लाभलेल्या सोज्वळ, शालीन नूतनवर सौंदर्य प्रसाधनांचा मारा केला आणि आधुनिक पोशाख घालून नटवलं तर ती कशी दिसेल तसंच काहीसं कारवारच्या बाबतीत झाल्यासारखं वाटतं. कारवारच्या बाह्यरुपात परिवर्तन झालंच. परंतु अंतरंगातही? हो. कां नाही होणार? मूळ कारवारकरच कारवार सोडून गेले. म्हणजे कारवारच्या अंतरात वसलेला आत्माच गेल्यासारखं की! आता दिसतो तो देह...आधुनिकतेने नटलेला. अंत:करणातला गोडवाच हरवलेलं ते कारवार आज खरोखर परकेच वाटतंय. कन्नडिगांची दाटीवाटी, मराठीची हकालपट्टी हे मनाला रुचेलच कसे?

रस्ते तेच. पण रस्त्याच्या दुतर्फा असलेली लाल कौलांच्या टोप्या घातलेली गोजिरवाणी घरे, त्या घरांच्या खिडकीतून येता-जाता 'बाय' करण्यासाठी हलणारे हात, मोठाले वृक्ष, आमचं कायम मनोरंजन करणारं शिरीन टॉकीज़, मुलींच्या शाळेसमोर 'ओवळा-कांदळा, चाफे, कळ्याचेंडू, जांभळांच्या बुट्ट्या घेऊन बसलेल्या विक्रेत्या बायकांची फतकले, हात रंगवणारी मेंदीची कुंपणे, ही सारी दृष्ये आज लुप्त झालीयेत. 'वेळे'वर निसर्ग देवतेने अंथरलेला शुभ्र वाळूचा गालीचा, त्यावर विसावलेल्या कोळ्यांच्या होड्या, होडीत बालमैत्रिणींसोबत बसून चिमणीच्या दातांनी खाल्लेली ही मीठ-कैरी, झोपडीतून सुटलेला भाजलेल्या सुक्या बांगड्याचा आजही नाकात वास करून राहिलेला वास... हे सारं दर्याने पोटात गडपच करून टाकलं असेल.

आज गुरुपौर्णिमा. थोर गुरुंना वंदन करताना आमच्या हिंदु हायस्कूलचाही विचार मनात घोळतो. आमच्या वेळचे ते हिंदुहायस्कूल आज देहाने प्रचंड विस्तारलेय. त्याच्या अंतरंगा (शिक्षणा) बाबत काहीच माहीत नाही. आम्हाला लाभलेल्या कुलकर्णीमास्तर, रावमास्तर, वागळेमास्तर, भेंडेमास्तर, फेणेमास्तर, सबनिसमास्तर, सुशीलाबाई, सुखटणकरबाई, वाघबाई, अशा ऋषीतुल्य, त्यागशील शिक्षकांनी अशा शाळेचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी घेतलेली मेहनत फलदायी ठरली. आजही तो दर्जा टिकवून ठेवणारा शिक्षकवर्ग शाळेत असेल का? औद्योगिक प्रगतीच्या ओझ्याखाली मूळ संस्कृतीच चिरडली गेलीय.

गावी गेल्यावर भेटणाऱ्या तिकडील गंगाक, सारस्वत्याक वगैरे आज्यांचा, 'यो गो पुता घरा. आंबे खावन वच' किंवा 'आज पोस केला. इलो खावन् वच गो पोरा' अशा मधाळ आपुलकीच्या शब्दांची मी आजही भुकेली आहे. आपल्या बागेतला हापूस आंबा मुंबईस्थित मित्रांच्या एकेक तरी तोंडात पडू दे. या प्रेमापोटी आंबे पाठवून देणारा आणि हॉटेलमध्ये उतरतेल्या मित्रांना आपल्या घरी घेऊन येणारा एखादा तरी माणूसलोभी शंकर तेलंग (माझे वडील) आजच्या कारवारमध्ये सापडेल का? तो प्रेमाने पाठवलेला एक आंबा पाहून वागळेमास्तरांचे डोळे पाणावले होते म्हणे. अशा प्रेमळ कारवारकरांचा तो काळ आज कुठे राहिलाय?

अशा या प्रेमाने ओथंबलेल्या कारवारच्या 'जरी त्या पुसून गेल्या साऱ्या जुन्या खुणा -- तरी मी ते आज हरवलेलं, काळजात जपून ठेवलेले कारवार मनाच्या आरशात बघत असते -- साश्रुनयनाने!

**– मीरा निशीथ प्रभूवेलेंकर**

## *पेशींच्या शेतीचा प्रयोग*

**(पाठदुखीवरील उपचारांसाठी वालावलकर रुग्णालयात नवे संशोधन )**

धान्याची, फुलांची शेती आपल्याला ठाऊक आहे. पण, मानवी शरीरातील पेशींचीही चक्क शेती करता आली तर? प्रयोगशाळेत पेशींची वाढ करून पाठदुखी किंवा कंबरदुखीने त्रस्त असलेल्या रुग्णांवर त्याद्वारे उपचार करण्याचे तंत्रज्ञान भारतात प्रथमच डेरवण येथील बी. के. एल. वालावलकर या रुग्णालयात विकसित करण्यांत आले आहे. 'रिजनरेटिव्ह सेल थेरपी' असे हे नावीन्यपूर्ण संशोधन असून क्लिनिकल ट्रायलअंतर्गत एका रुग्णामध्ये मणक्याच्या चकतीतील पेशींचे प्रत्यारोपण यशस्वी पार पडले.

या नव्या तंत्रज्ञानामुळे मणक्यावरील उपचारांचे अधिक पर्याय उपलब्ध होऊ शकतील. तसेच मुख्य म्हणजे मणक्याची लवचिकता कायम ठेवून रुग्णाला पुढे कार्यरत राहणे शक्य होईल.

**– डॉ. सुनील मनोहर नाडकर्णी, अस्थिरोगतज्ज्ञ**

**आम्हा संघाच्या ज्ञातिबांधवांना डॉ. सुनील मनोहर नाडकर्णींचा अभिमान वाटतो.**


# SHREE HOMOEPATHIC PHARMACY

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoepathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

## मुंबई मंच - आनंद मेळावा

१९ जानेवारी २०२५

तुम्हा सर्वांना माहीतच असेल की गेल्या जुलै ते सप्टेंबर च्या मुखपत्रिकेत नमूद केल्याप्रमाणे, NKGSB मुंबई मंचाने १९ जानेवारी २०२५ रोजी आनंद मेळा करण्याचे योजिले आहे.

या आनंद मेळ्यात खाद्यपदार्थांबरोबर विविध खेळ, कलाकुसरी च्या वस्तू (पर्सेस, शोभेच्या वस्तू आदी) या सर्वांचा समावेश असणार आहे.आपली कलाकृती, व्यवसाय आणि पाककला सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी हे एक उत्तम व्यासपीठ ठरणार आहे .

आपण खाली नमूद केलेल्या कोणत्याही प्रकारे यात सहभागी होऊ शकता :

१. खाद्यपदार्थांचा स्टॉल (ताजे तसेच फराळाचे)

२. मनोरंजक खेळांचा स्टॉल

३. केलेल्या वस्तू – कपडे, पर्सेस, शोभेच्या वस्तू इत्यादी

४. प्रायोजक /(Sponsorship)-स्वतःचे बॅनर, व्यवसाय पत्रिका (flyer), भित्ती पत्रक

५. देणगीदार (Donation): आपल्या ज्ञातिचा हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी आपल्या सढळ आर्थिक मदतीसाठी मुंबई मंचतर्फे नम्र आवाहन.

**मेळ्याचा तपशील असा आहे : तारीख /वार : रविवार,१९ जानेवारी २०२५**

**स्थळ :** के. जी.एस सोसायटीचे पटांगण, सरस्वती बाग, जोगेश्वरी (पूर्व ).

**वेळ :** सायंकाळी 4.30 pm - 9.30 pm

ज्यांना वरीलपैकी कोणत्याही प्रकारे सहभागी व्हायचे असेल त्यांनी mumbaimanch.nkgsbsangh@gmail.com' या email address वर आपले नाव, मोबाईल आणि stall/banner/ sponsorship स्वरूप आदी तपशील मेल करावेत किंवा खालीलपैकी कुठल्याही मोबाईल नंबरवर WA करावेत.

१. प्रदीप दाभोळकर: ९७६४००६३०८

२. अमित वाघ : ९८२०५२४३३९

३. वंदना सोहोनी : ९८१९२१०३५४

४. संगीता कसबेकर: ९८१९४१६३३८

सर्व ज्ञातिबांधवाना मुंबई मंचचे आग्रहाचे निमंत्रण आहे की त्यांनी आपल्या कुटुंबीय आणि मित्रपरिवारा सह मोठ्या संख्येने येऊन या आनंद मेळ्याची शान वाढवावी

आवर्जून यायचं हा ! तर मग भेटू १९ जानेवारीला आनंद मेळ्यात!







दीप प्रज्वलन करताना सर्व मान्यवर

संघाध्यक्ष मारुती दळवी
भाषण करताना






एज्यु.सोसायटी अध्यक्ष देवदास नाडकर्णी
भाषण करताना







प्रमुख पाहुणे पद्मश्री उदय देशपांडे भाषण करताना

मुलींचा चमू प्रात्यक्षिके दाखवताना





मुलांचा चमू प्रात्यक्षिके दाखवताना



मुलांचा चमू प्रात्यक्षिके दाखवताना

मुलगी मल्लखांब प्रात्यक्षिक दाखवताना





मुलींचा चमू प्रात्यक्षिके दाखवताना





मुलांचा आणि मुलींचा एकत्र चमू





सौ.सुखदा उदय देशपांडे बक्षीसे वितरण करताना.

सौ.सुखदा उदय देशपांडे बक्षीसे वितरण करताना.





सौ. व श्री. राजेश दिवेकर देवतांसमोर दीप प्रज्वलीत करतना.

शशांक दिवेकर व त्यांचा (संगीत कलाकार मंच)





तुडुंब भरलेला तेंडूलकर हॉल मंत्रमुग्ध प्रेक्षक.







ठाणे मंचच्या पदाधिकाऱ्यांसह संगीत कलाकार.

मुखपत्रिकेचे संपादक प्रसाद कसबेकर, शंशांक दिवंकरांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करातना.





गाणी ऐकण्यात गुंग झालेला श्रोतेवृंद

***

## ‘शब्द सुरांच्या रेशीम गाठी’

रविवार दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी ठाणे मंचने आयोजित केलेल्या मराठी, हिंदी गाण्यांची धुंद, बहारदार संगीत मैफल ठाणे मंचाचे हितचिंतक आणिक पुण्यातील प्रसिद्ध गायक श्री. शशांक मोहन दिवेकर यांनी आपल्या कलाकारांसोबत रसिक श्रोत्यांना आपल्या सुंदर गायकीची चमक दाखविली.

**कार्यक्रम फारच छान झाला. माहिमचा तेंडुलकर हॉल संपूर्ण भरला होता.**

सुरुवातीला प्रेक्षकांना शशांक दिवेकरांची गुरु, त्यांची मोठी बहीण श्यामल मुजुमदार यांची ओळख करून देण्यात आली. शशांक बरोबर श्रुती देवस्थळी ही सहगायिका होती. तिचा आवाज पण श्रवणीय होता.

हार्मोनियमवर प्रसन्न बाम, तबल्यावर अमित कुंटे, ऱ्हीदम मशीन अविनाश कुळकर्णी, की बोर्ड वर सुभाष देशपांडे तसेच निवेदन हेमंत बर्वे फारच छान काम करत होते.

शशांकने गायलेली मराठी, हिंदी गाणी अत्यंत तालबद्ध होती. ती ऐकून टाळ्या मारण्याचा मोह आवरत नव्हता. काही गाण्यास ऊभे राहून प्रेक्षकांनी वन्स मोर दिले. मुखपत्रिकेचे संपादक प्रसाद कसबेकर यांनी अनेक गाण्यांना स्टेजपर्यंत जाऊन गाणे ‘उत्तम’ झाल्याचा उस्फूर्त प्रतिसाद दिला.

‘बगळयांची माळ फुले’, ’मन शुद्ध तुझ गोष्ट हाये पृथ्वी मोलाची‘, ‘सांगा मुकुंद कुणी हा पाहिला’, ‘दिवस तुझे हे फुलायचे’ ही मराठी गाणी आणि ‘कुहू कुहू बोले कोहलिया’, ‘ए मेरी जोहरा जबीं’, ‘दीवाना हुवा बादल’ आणि अखेरीस ‘लगा चुनरी में दाग’ ह्या गाण्यानंतर रसिक प्रेक्षक एक मुखाने वाहवा म्हणत राहिले. टाळ्यांच्या गजरात ह्या मैफलीची समाप्ती झाली.

कार्यक्रमापूर्वी रुचकर नाश्ता आणि घरी जाताना अल्पोपाहार बॉक्स घेऊन मंच आयोजित बसींमधून सर्व स्वगृही परतले.

कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल सर्वश्री. राजेश दिवेकर, गिरीश रेगे, प्रसाद गायतोंडे आणि सुरेश पालेकर ह्या ठाणे मंच कार्यकर्त्यांचे अभिनंदन.

**– ऊमाकांत पालेकर, जोगेश्वरी**

**मोबाइल – ८१०८२९६९१२**

***



## महिलांचा श्रावणातला स्नेह मेळावा जोगेश्वरी

शुक्रवार २३ ऑगस्टं रोजी नेहमीचा श्रावणातला महिलांचा स्नेह मेळावा समारंभ सरस्वती बाग, जोगेश्वरीच्या रामनाथ मंदीराच्या सभागृहात संपन्न झाला. जवळ जवळ ७० महिलांनी कार्यक्रमात भाग घेतला.

अल्पोपहार म्हणून बटाटा चिवडा, पंजाबी सामोसा, राजगीरा चिक्की व थंड पेये देण्यात आली.

एकूण समारंभ फारच छान झाला.

शांता पालेकर

मोबाइल : ८८५००६६३८३




## श्रावणातील महिला स्नेह मेळावा, ठाणे मंच

शुक्रवार दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी श्रावणातला ठाणे मंच तर्फे महिलांचा स्नेह मेळावा मुलुंड यथे राहणाऱ्या आमच्या भगीनी श्रीमती सुषमा मुळगांवकर यांच्या निवासस्थानी थाटामाटात साजरा झाला.

साधारण ४५ महिलांनी या समारंभास हजेरी लावली.

मसाला दुध, कटलेट्स, नारळीपाक आणि केळा वेफर्सने कार्यक्रमांची लज्जत आणिक वाढवली.




## ठाणे मंच आयोजित पाक कला स्पर्धा २०२५

**पदार्थाचे नावः नाश्त्यातील पौष्टिक पदार्थ –** पदार्थ शाकाहारी असावा.

स्पर्धकाने पदार्थ घरी बनवून आणावा. एका स्पर्धकाने एकच पदार्थ करायचा. पदार्थांची चव, सजावट, मांडणीवर विजेत्याची निवड पदार्थाची कृती, घटक पदार्थ, पोषण मुल्य लिहून आणावे. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

**तारीख :** रविवार, ४ मे २०२५

**स्थळ :** तेंडुलकर सभागृह, माहीम **वेळ :** दुपारी ४.०० ते ७.०० वा.

इच्छुक स्पर्धकांनी त्वरित आपली नावे नोंदवावित

बक्षीसे : रुपये – १) २००१/– २) १५०१/– ३) १००१/–

उत्तेजनार्थ ५ x ५०१/–

✻ वरील स्पर्धेसाठी तीन परीक्षक पाहिजेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा

अधिक माहितीसाठी संपर्क

सुरेश पालेकर : ८९२८८५०१९

राजेश दिवेकर:९६१९३६२४६०

गिरीश रेग : ९९२२१६८७२५

स्पर्धा झाल्यावर करावके वर सुरेल हिंदी/मराठीतून गाणे गाणाऱ्यांनी आपली नावे लवकर कळवावीत.


**A name that spells its class !**

# WINOVER CATERERS

**Marriages, Thread Ceremonies,**
**Engagement and Birthday Parties Etc.**

**WE DELIVER FOOD / SNACKS FOR PARTIES AT HOME**

**Take away and TIFFINS Or opt for Ala-carte**
**Amchi food and Variety cuisines**

ALL OVER MUMBAI-THANE-VIRAR

**Call or Whatsapp for our take away menu**
**Vinod Kaval / Ashwini / Rupali**
**98208 43392 / 90048 41198 / 98923 00608**

**Shop No. 4, Andrea Apartment off Azad Road, Vile Parle East, Mumbai - 400 057**






**NKGSB Co-operative Bank Ltd.** (Multi-State Scheduled Bank)

SINCE 1917

**Panaji Branch**




**Inauguration of New Premises dt. November 11, 2024**
**at Dempo House,Ground Floor, Campel, Panaji, Goa - 403001.**

**India's Leading & Trusted Business Group Invites You For Career & Business Opportunity**

**Learn From Successful Entrepreneurs For Unlimited Income**
**Opportunity Is Specially for Retired, Senior Citizens, Home Makers, Housewives, VRS, 35 & Above**

**One Opportunity Many Benefits**

- ₹ Enjoy unlimited earning opportunity
- Work as per your convenience
- Zero Investment & unlimited Income
- Be your own boss
- Travel abroad to Our conventions

**For Registration Please Call - 7506631575**
**ONE CALL WILL CHANGE YOUR LIFE**

## घालीन लोटांगण या प्रार्थनेचे रहस्य तुम्हाला माहित आहे का?

हे आवश्य वाचा.

कोणत्याही देवाच्या आरती नंतर एका सुरात व धावत्या चालीत ही प्रार्थना म्हटली जाते. अतिशय श्रवणीय व नादमधुर असल्याने खूपच लोकप्रिय आहे. सर्वत्र म्हटली जाते व भक्त त्यात तल्लीन होऊन जातात. आज आपण या प्रार्थने मधील वैशिष्टे पाहूया व त्याचा अर्थ समजावून घेऊ.
ही प्रार्थना चार कडव्यांची आहे व पाचवे कडवे हा एक मंत्र आहे.
वैशिष्ट्ये :
(१) प्रार्थनेतील चारही कडव्यांचे रचयिता वेगवेगळे आहेत.
(२) ही चारही कडवी वेगवेगळ्या कालखंडात लिहिली गेली आहेत.
(३) पहिले कडवे मराठीत असून उरलेली कडवी संस्कृत भाषेत आहेत.
(४) बऱ्याच जणांना असे वाटते की ही गणपतीची प्रार्थना आहे. पण ही सर्व देवांच्या आरती नंतर म्हटली जाते.
(५) यातील एकही कडवे गणपतीला उद्देशून नाही.
(६) वेगवेगळ्या कवींची व वेगवेगळ्या कालखंडातील कडवी एकत्र करून ही प्रार्थना बनवली गेली आहे.आता आपण प्रत्येक कडवे अर्थासह पाहूया
१) घालीन लोटांगण वंदीन चरण डोळ्यांनी पाहिन रूप तुझे।
प्रेमे आलिंगन आनंदे पूजीन। भावे ओवाळीन म्हणे नामा।
वरील कडवे संत नामदेवांनी तेराव्या शतकात लिहिलेली एक सुंदर रचना आहे.अर्थ विठ्ठलाला उद्देशून संत नामदेव म्हणतात, तुला मी लोटांगण घालीन व तुझ्या चरणांना वंदन करीन. माझ्या डोळ्यांनी तुझे रूप पाहिन एवढेच नाही तर तुला मी प्रेमाने आलिंगन देऊन अत्यंत मनोभावे तुला ओवाळीन.
२) त्वमेव माता च पिता त्वमेव । त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव । त्वमेव सर्व मम देव देव ।
हे कडवे आद्य शंकराचार्यांनी गुरुस्तोत्रात लिहिलेले आहे. ते संस्कृतमध्ये आहे.
हे आठव्या शतकात लिहिले गेले आहे.
अर्थ
तूच माझी माता व पिता आहेस. तूच माझा बंधू आणि मित्र आहेस. तूच माझे ज्ञान आणि धन आहेस. तूच माझे सर्वस्व आहेस.
(३) कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा ।
बुद्ध्यात्मना वा प्रकृती स्वभावात । करोमि यद्येत सकल परस्मै । नारायणापि समर्पयामि ।।
हे कडवे श्रीमद् भागवत पुराणातील आहे. ते व्यासांनी लिहिलेले आहे.
अर्थ...
श्रीकृष्णाला उद्देशून हे नारायणा, माझी काया व माझे बोलणे माझे मन, माझी इंद्रिये, माझी बुद्धी माझा स्वभाव आणि माझी प्रकृती यांनी जे काही कर्म मी करीत आहे ते सर्व मी तुला समर्पित करीत आहे.
(४) अच्युतम केशवम रामनारायणं । कृष्ण दामोदरम वासुदेवं हरी।
श्रीधर माधवं गोपिकावल्लभं । जानकी नायक रामचंद्र भजे ।।



वरील कडवे आदि शंकराचार्यांच्या अच्युताष्टकम्मधील आहे. म्हणजेच आठव्या शतकातील आहे.
अर्थ...
मी भजतो त्या अच्युताला, त्या केशवाला, त्या रामनारायणाला, त्या श्रीधराला, त्या माधवाला, त्या गोपिका वल्लभाला त्या श्रीकृष्णाला आणि मी भजतो त्या जानकी नायक श्रीरामचंद्राला.
हरे राम हरे राम । राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण । कृष्ण कृष्ण हरे हरे ।
हा सोळा अक्षरी मंत्र 'कलीसंतरणं' या उपनिषदातील आहे.

कलियुगाचा धर्म हे हरिनाम संकीर्तन आहे. याशिवाय कलियुगात कोणताच उपाय नाही. हा मंत्र श्री राम कृष्णाला समर्पित आहे. अशी ही वेगवेगळ्या कवींची, वेगवेगळ्या भाषेचे मिश्रण असलेली प्रार्थना अत्यंत श्रवणीय आहे. तिचे नादमाधुर्य व चाल अलौकिक आहे. रचना कोणाची असो, हे गाताना भक्त तल्लीन होतात व त्यांचा भाव देवापर्यंत पोचतो.
अर्थ समजून म्हटले तर आरतीमध्ये भाव येतात....

**– संकलन : दत्तात्रय नागेश नाडकर्णी**

## एनकेजीएसबी को–ऑपरेटिव्ह बँकेला विविध पुरस्कार

एनकेजीएसबी को–ऑपरेटिव्ह बँकेने २०२३–२४ आर्थिक वर्षातील कामगिरीसाठी खालील पुरस्कार मिळवले. बँकिंग फ्रं टियर्स इन को–ऑपरेटिव बैंकिंग अवॉर्ड २०२४ (लार्ज यूसीबी श्रेणी) अंतर्गत: सर्वोत्तम क्रेडिट पुढाकार सर्वोत्तम सायबर सुरक्षा उपक्रम आणि सर्वोत्तम वार्षिक अहवाल बँकेला बृहन्मुंबई नागरी सहकारी बैंक्स असोसिएशन लिमिटेड मुंबईकडून श्रेणीतील सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार, द्वितीय पारितोषिक (रु.५,००१ कोटींहून अधिक ठेवी) देखील मिळाला.

गेल्या ३ वर्षात एनकेजीएसबी बैंकेने लक्षणीय प्रगती केली आहे. बिझनेस मिक्स आर्थिक वर्ष २०२१–२२ मध्ये रु. ११०२४ कोटी वरुन ते आर्थिक वर्ष २०२३–२४ मध्ये रु. १३,००६ कोटी वर पोहोचले आहे. एनकेजीएसबी बैंक नेहमीच सर्वोत्तम बँकिंग सेवा देणारी ग्राहक केंद्रित राहिली आहे. ठेवींवरील व्याजदर अतिशय आकर्षक आहेत आणि बँक बाजारातील स्पर्धात्मक दराने कर्ज देते.बँकेने आपल्या ग्राहकांना बँकिंग सुलभ करण्यासाठी तंत्रज्ञानाचा अवलंब केला आहे आणि त्याचा लाभ घेतला आहे. बँकेच्या नेट बँकींग (Quick Net) सुविधा आणि मोबाईल बँकिंग (Quick Mobil) सुविधेसह आता कोणीही त्यांच्या ठिकाणी बैंकिंग करू शकतो. बँक POS टर्मिनल्स आणि QR कोड सुविधेद्वारे पेमेंट स्वीकृती उपाय ऑफर करते.

कॉर्पोरेट एजंट म्हणून, बैंक ग्राहकांना जीवन, सामान्य वाणि आरोग्य विमा ऑफर करते. हे ग्राहकांना विविध म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक करण्याची संधी देखील देते. १०७ वर्षांचा वारसा घेऊन, एनकेजीएसबी को–ऑपरेटिव्ह बँक आज भारतातील पहिल्या दहा सहकारी बँकांमध्ये ओळखली जाते.

**– शांतेश वर्टी**–उपाध्यक्ष एनकेजीएसबी बँक




**Girish Nadkarni (son of Dinnanth Nadkarni, Jogeshwari) gets Distinguished Alumni Award 2024 from Indian Institute of Management - Kozhikode**

In a ceremony at IIM-K, Girish Nadkarni was presented the prestigious " **Distinguished Alumni Award 2024** " by the Dean in recognition of his exceptional achievements, professional leadership and outstanding contribution to the community.

IIMK said " Mr. Girish Nadkarni is a pioneering force, with over 25 years of leadership experience in diverse business verticals. After achieving EVP & CFO position at Tatas at an early age, he plunged into Private Equity. He has taken, over past 15 years, Partner & MD positions at global private equity firms like IDFC PE, Investcorp and GHS, a leading student housing buyout firm. His signature multibillion control investments are Green Infra Renewables, Idea Cellular Mobile, General Chemicals USA. He has a proven track record of achieving superior returns on his investment portfolios and has spearheaded over 25 complex investment transactions. He was director on the boards of over 20 reputed companies." Girish Nadkarni is a all India rank holder Chartered Accountant, MBA from IIMK, Fulbright Scholar from Carnegie Melon and CGMA, FCMA (UK).

## अरविंद गंडभीर हायस्कूल चालविणारी जोगेश्वरी एज्युकेशन सोसायटी



आदर्श शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक पुरस्कार - २०२४
पुरस्कार निवड समिती

प्रति,
मा. अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
जोगेश्वरी एज्युकेशन सोसायटी
अरविंद गंडभीर हायस्कूल,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६०.

हार्दिक अभिनंदन !

'आदर्श शाळा'

शिक्षक दिन पुरस्कार - २०२४
पुरस्कार निवड समिती

आपले ज्ञातीबांधव कुठेही स्थायिक झाले तरी एकादी शाळा स्थापन केल्याशिवाय त्यांना राहवतच नाही. सदाशिवगड, कारवार, अवर्सा, माजाळी, अंकोला, हळगे इत्यादी अनेक मूळगावी तेथी कर्तबगार पूर्वजांनी शाळा स्थापन केलेल्या आपल्याला आढळून येतात. १९१९ च्या दरम्यान जोगेश्वरी येथे काही गौड सारस्वत मंडळींची 'मिनी कारवार' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'सरस्वती बाग' या नावाची वसाहत स्थापन केली तेव्हा तेथे बस्तान बसल्यावर लगेच तेथेही एक शाळा केल्यासच नवल. गेल्या पिढीतील एक अनुभवी शिक्षणतज्ज्ञ कै. शांताराम गणबा वर्टी व कै. महाबळेश्वर विनायक तेलंग यांच्या



पुढाकाराने १९३२ साली सरस्वती बाग येथेच माध्यमिक शाळेचे पहिले दोन वर्ग (आताची ५वी व ६वी) सुरू करण्यात आले.

१९३२ साली पहिल्या वर्षी माध्यमिक शाळेच्या दोन वर्गात सोळाच विद्यार्थी होते. सुरुवातीला काही वर्षे सोसायटीतल्या काही घरातून (सरस्वती बागेचे प्रचलित नाव म्हणजे सोसायटी) व शांताराम हॉलच्या विस्तारित जागेत वर्ग भरविण्यात येत असत. आता शाळेच्या स्वतःच्या मालकीच्या दोन सुसज्ज इमारती आहेत. शाळा विस्तारीत होता होता वर्गही वाढविण्यात आले. शालांत परीक्षेची पहिली तुकडी १९५४ साली परीक्षेस बसली व सोसायटीतील एक कर्ते पुरुष श्री. वाय. बी. गायतोंडे यांचे चिरंजीव अशोक पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. यानंतर शाळेच्या उत्कर्षाचा आलेख चढतच राहिला. शाळेचे नाव उज्वल करणाऱ्या बऱ्याच विद्यार्थ्यांची नावे सातत्याने गुणवत्ता यादीत येऊ लागली. या सर्वावर कळस म्हणजे १९८८ साली मंगेश म्हसकर हा चाळीत राहणारा विद्यार्थी शालांत परीक्षेत बोर्डातून सर्वप्रथम आला. १९९७ साली अपंग विद्यार्थ्यांतून बोर्डामधून पहिला आलेला विजय कलमकर हा याच शाळेचा विद्यार्थी. सध्या शालांत परीक्षेला चारशेहून अधिक विद्यार्थी बसतात व उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी जवळजवळ ९८% एवढी प्रशंसनीय असते. बहुतांश विद्यार्थी हे आर्थिकदृष्ट्या मध्यम किंवा कनिष्ठ स्तरातील असतात हे लक्षात घेता ही टक्केवारी कौतुकास्पद म्हणायला पाहिजे.

१९५७ साली शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या सोहळ्याच्या अंतर्गत ३ ऑक्टोबर १९५७ रोजी तेव्हाचे मुबईचे महापौर आचार्य दोंदे यांच्या हस्ते शाळेच्या नव्या इमारतीचे उद्‌घाटन झाले. श्री. बाळकृष्ण (बुना) गंडभीर यांनी दिलेल्या भरघोस देणगीतून ही वास्तू साकार झाल्याने जोगेश्वरी इंग्लिश स्कूलचे अरविंद गंडभीर हायस्कूल असे नामकरण झाले. रौप्य महोत्सवी वर्षाच्या आणखी एका समारंभात पु.ल. देशपांडे हे प्रमुख पाहुणे होते. पु.लं.चे शिक्षण या शाळेत झालेले नसले तरी त्यांचे बालपण सोसायटीतच गेले होते व त्यांचे प्राथमिक शिक्षणही सोसायटीतल्याच शाळेत झाले होते.

शाळेचा उच्च दर्जा, तेथील सौहार्दाचे वातावरण व अपार कष्ट घेणारा शिक्षकवर्ग यामुळे जोगेश्वरीच्या परिसरातील विद्यार्थीवर्ग या शाळेकडे आकृष्ट होऊ लागला. विद्यार्थ्यांच्या सतत वाढणाऱ्या संख्येमुळे सरस्वती बागेतल्या इमारतीची जागा अपुरी पडू लागली. सुदैवाने नजीकच्या ईस्माईल युसुफ कॉलेजचे तेव्हाचे प्राचार्य पु. शि. रेगे यांच्या पुढाकाराने व सहकायनि कॉलेजच्या पटांगणातला एक भाग शाळेला मिळाला. त्या जागेत आपल्या बँकेने दिलेल्या कर्ज साहाय्याने १९७१ साली एक नवीन सुसज्ज इमारत पूर्ण झाली व माध्यमिक शाळेचे वर्ग नवीन इमारतीत भरविण्यात येऊ लागले. नंतर काही वर्षांनी श्री. बाळकृष्ण गंडभीर यांचे चिरंजीव श्री. दिगंबर (मनोहर) यांनी आपल्या आईवडिलांच्या नावे भरघोस देणगी दिली व त्याचा विनियोग तेथे एक अद्ययावत संगणक केंद्र स्थापन करण्यासाठी झाला.

## ज्ञातीतील पहिले एम्.ए. – श्री. शांताराम गणबा वर्टी
## (४ सप्टेंबर १८८७ – २ सप्टेंबर १९३९)

नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन यांच्या निष्कर्षानुसार समाजाची आर्थिक उन्नती साधायची असेल तर अगोदर त्यांची शैक्षणिक प्रगती साधणे आवश्यक आहे. आमच्या पूर्वजांची दूरदृष्टी एवढी विशाल होती की शंभर वर्षापूर्वीच त्यांना या वस्तुस्थितीची जाणीव झाली होती. तेव्हा कुठेही स्थायिक झाले तरी एखादी शाळा किंवा शिक्षण संस्था सुरू केल्याशिवाय ते स्वस्थ बसू शकत नव्हते. सदाशिवगड, कारवार, माजाळी, हळगे, अवर्सा, अंकोला अशा अनेक ठिकाणी आपल्या जातिबांधवांनी सुरू केलेल्या शिक्षण संस्था दिसून येतात. त्याला सरस्वती बागेतील रहिवासी कसे अपवाद असणार? १९३२ साली सरस्वती बागेत माध्यमिक शाळेचे पहिले दोन वर्ग (हल्लीचे पाचवी व सहावी) सुरू करण्यात आले व त्यात पुढाकार घेतला होता थोर शिक्षणतज्ज्ञ श्री. शांताराम गणबा वर्टी यांनी.

श्री. वर्टी १९०२ ला मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. १९०८ साली विल्सन कॉलेजमधून ते बी.ए. झाले. नंतर काही वर्षे कुमठा येथील प्रख्यात गिब हायस्कूलात चार वर्षे शिक्षक म्हणून राहिले. १९१५ सालो इतिहास व अर्थशास्त्र हे विषय घेऊन ते एम्.ए. परीक्षा उत्तीर्ण झाले. ते कारवारी गौ.सा.ब्रा. ज्ञातीतले पहिले एम्.ए. ते तडफदार, तापट व स्पष्टवक्ते असल्यामुळे त्यांच्यापुढे कुणाचे काही चालत नसे. ते खंदे लेखक, उत्तम वक्ते आणि अर्थशास्त्र व समाजशास्त्र या विषयातील तज्ज्ञ होते. १९२० साली सर नारायणराव चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी कॅनरा डिस्ट्रीक्ट कॉन्फरन्स भरविली होती. १९२२ साली कॅनरा प्राथमिक टीचर्स कॉन्फरन्सचे ते अध्यक्ष झाले होते. बॉम्बे प्रेसिडेन्सी पोस्टमेन्स युनियनचे ते ऑनररी सेक्रेटरी होते. त्यांचा पहिला ग्रंथ म्हणजे ज्ञातीतील पहिले एल.एल.बी. (LL.B.) व जज्ज झालेले व्यंकटराव (वैकुंठ वाघ) यांचे चरित्र होय.

मुंबई म्युनिसिपल शाळांच्या कारभाराची त्यांनी माहिती करून घेतली व नंतर त्या संबंधाने टाईम्स ऑफ इंडियात १९२४ साली सहा लेख लिहिले व त्यातील दोष दाखवून कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत हेही सुचविले. पुढे ते लेख पुस्तक रूपाने प्रसिद्ध करण्यात आले आणि १९२४ सालापासून प्राथमिक शाळात सुधारणा सुरू झाली. अनेक मासिकात हिंदी व इंग्लिश दैनिकातून सामाजिक, राजकीय व अर्थशास्त्र या विषयावर ते लिखाण करीत. ते खंदे लेखक होते. भावनेच्या आहारी न जाता समतोल वृत्तीने लेखन करण्यात ते तरबेज होते. त्यांनी मिस् कॅथरीन मेयो यांच्या 'मदर इंडिया' या पुस्तकाला उत्तर म्हणून १९२८ साली 'सिस्टर इंडिया' या नावाचे पुस्तक छापून प्रसिद्ध केले. त्यावरून त्यांना हिदी स्त्रियांविषयी किती आदर व अभिमान होता हे सिद्ध होते.

ते सरस्वती बागेत रहावयास आले. तेथे ते भाई महाराजांच्या प्रवचनास जात असत. तेथे त्यांना एक गोष्ट खटकली. लगेच त्यांनी निर्भयतेने ती गोष्ट भाईच्या कानावर घातली. तेव्हा भाईनी लगेच त्याचा बंदोबस्त केला.

१९३५ साली त्यांनी 'What is wrong with Bombay University' या नावाचे पुस्तक प्रसिद्ध करून विश्वविद्यालयाच्या पोकळ शैक्षणिक धोरणावर खडसून टीका केली. ते बडोद्यास अलेंबिक केमिकल वर्क्स तर्फे जुलै १९३८ पासून सुरू झालेल्या 'इंडियन वर्ल्ड' या मासिकाचे संपादक होते. त्यामुळे कंपनीचा दर्जा वाढला ही गोष्ट कंपनीने मान्य केली.

२ सप्टेंबर १९३९ रोजी एकाएकी आजारी पडून ते कालवश झाले.



### श्रद्धांजली



**श्रीमती कमल (अंबुताई) मोहन कसबेकर**

**(जन्म: २७–११–१९२४ मृत्यु : २४–३–२०२२)**

तू आम्हांला सोडून जाऊन ३ वर्ष होतील,
परंतु तुझी आठवण आजही क्षणोक्षणी येते.
गेल्या २७ नोव्हेंबर २०२४ ला तुझी शंभरी साजरी झाली असती !
तुझ्याच सदैव आठवणीत !

*मुलगे : प्रसाद (पंकज) व नवनीत*
*मुलगी : संध्या सोहोनी, तसेच सुना व नातवंडे*

### श्रद्धांजली



**Smt Kusum Sadanand Nadkarni**

**(21.07.1933 to 19.10.2024)**

**PLACE OF RESIDENCE: KANDIVALI-EAST**
**PLACE OF BIRTH: SADASHIVGAD, KARWAR**
**DEEPLY MOURNED BY:**
**PRADEEP & VASUDHA I SUNIL & SANGITA**
**SIDDHARTH & SIDDHESH**



## My Boss
# RATAN TATA

I lost one of my good Super Boss! I was indeed fortunate to have worked in Tata Group. But unfortunately Mr. Tata never ever remembered my first name ! he would always call me Prof. Pinge's Son despite the fact that he would meet me every quarter (for Board Meetings of Tata Motors & JLR in UK) from 2009 till 2012. Also had the privilege of sitting at 4 AGMs (which he was chairing) just behind Directors sitting row.

My father (ex-Tata Institute of Social Sciences) and Mr. Tata had worked together on some charity assignment together during his NELCO days and Mr. Tata would invariably remember him as soon as he would see me as I resemble like my father.

Dear Sir,

You inherited a great empire and took it to the daisy heights during your timel....I was a fortunate Tata Employee who was associated in the crack team in acquisition of JLR and bring it under Tata Group's fold. Your presence in JLR Meetings, during initial times gave us a great comfort.

Today Tata Group is the largest employer in UK! Your vision and aspiration truly made our group big!

You will continue to inspire us..forever. ..... Rest in peace Sir !

**Nagesh Pinge**

(Nagesh Pinge is a CA and was vice Chairman of our Bank.)

अरुण भास्कर कसबेकर यांच्या '' **कवडसे मनाचे** '' ह्या पुस्तकाला वाचकांकडून चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. तरी अजून ज्यांना हे पुस्तक विकत घ्यावयाचे असेल त्यांनी NKGSB SANGH च्या Office मध्ये संपर्क साधावा.

ऑफीस फोन नंबर मुखपत्रिकेच्या कव्हर पेजवर दिला आहे. धन्यवाद.



## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या (मागील अंकानंतर ) उल्लेखनीय देणग्या

### १. उद्योगश्री श्री. सतीश वाघ यांजकडून संघाला आणखी सहा लाख रुपयांची देणगी याशिवाय कोकीलाबेन होस्पिटलला एक कोटी रुपयांचे साहाय्य.

गोरेगांव येथील सुप्रिया लाईफ सायन्स या प्रचंड उद्योगसमुहाचे मालक श्री सतीश वामन वाघ हे एक कर्तबगार उद्योजक म्हणून प्रसिद्ध आहेत– त्यांना मिळालेली बक्षिसे, पारितोषिके, प्रशस्तीपत्रके याबद्दल मुखपत्रिकेत वेळोवेळी उल्लेख आला आहे. हश्मो प्रेमजी, सुधा मूर्ती, बिल गेटस्, रतन टाटा यांच्याप्रमाणे श्री. वाघसुद्धा अनेक सेवाभावी संस्थांना सढळ हस्ते साहाय्य करतात. अलीकडेच त्यांनी कोकिलाबेन हॉस्पिटलला बाल रुग्णांच्या उपचारासाठी एक कोटी रुपयांचे अनुदान दिले आहे. कोरोना साथीच्या वेळी लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीला आपल्या कंपनीमार्फत अद्ययावत उपचार केन्द्र स्थापन केले व पन्नास लाख रुपये अनुदान दिले.

आपल्या ज्ञातीसाठी सुद्धा ते सढळ हस्ताने देणग्या देतात. काही वर्षापूर्वी त्यांनी संधाला एक लाख व एज्युकेशन सोसायटीला तीन लाख मिळून चार लाखांची देणगी दिली होती. गेल्या वर्षीही त्यांनी संघाला सहा लाख रुपयांची देणगी दिली होती. यंदाही त्यांनी संघाला आणखी सहा लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यांचे आईवडील श्रीमती आशा व वडील श्री. वामन सुब्राव वाघ व आजोबा डॉ. पुंडलीक बाळकृष्ण देसाई यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ प्रत्येकी दोन दाख रुपये अशी विभागणी आहे.

### २. श्री अरविन्द गायतोंडे यांजकडून आणखी पाच लाख रुपयांची देणगी.

मुलुंड येथे राहणारे श्री. अरविन्द विश्वंभर गायतोंडे यांनी २०२० साली आपल्या बहिणीच्या स्मरणार्थ तीन लाख रुपयांची देणगी दिली होती. अलीकडेच त्यांनी वडील बंधू श्री. अरुणकुमार यांच्या द्वितीय पुण्यतिथी प्रसंगी त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ आणखी पाच लाख रुपयांची देगी दिली आहे. त्यातील तीन लाख वृद्धसेवा निधीसाठी आहेत उर्वरित दोन लाख एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत. श्री. अरुणकुमार हे सुद्धा वेळोवेळी आपल्या बहिणीच्या स्मरणार्थ संधाला भरघोस देणग्या देत असतात.

### ३. कै. श्रीकांत वाघ यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एज्युकेशन सोसायटीला आणखी सव्वा लाख रुपयांची देणगी

सँडॉस या औषध निर्मितीच्या उद्योगसमुहातून उच्च पदावरून निवृत्त झालेले पारले येथे राहणारे श्री. श्रीकांत दत्तात्रय वाघ यांचे दोन वर्षापूर्वी निधन झाले. त्यांच्या पहिल्या पुण्यतिथी निमित्त त्यांचे सुपुत्र श्री. वाघ यांनी गेल्या गेल्यावर्षी प्रथम पुण्यतिथीच्या प्रसंगी एज्युकेशन सोसायीला दीड लाख रुपयांची देणगी दिली होली. यंदाही त्यांनी कै. वाघ यांच्या द्वितीय पुण्यतिथी प्रसंगी आपल्या वडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एज्युकेशन सोसायटीला आणखी सव्वा लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### ४. श्री वासुदेव कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी

माहिम येथे राहणारे श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी है ज्ञातीच्या संदर्भातील अनेक क्षेत्रांत विशेष रस घ्यायचे. त्यांनी त्यांच्या हयातीत व त्यांच्या पश्चात त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांच्या स्मरणार्थ अनेक वेळा संघाला भरघोस देणग्या दिल्या आहेत, गेली काही वर्षे त्यांचा नातू श्री. कवीश दुर्गानंद (मच्छीन्द्र) कसबेकर, नातसून सौ. अरुंधती व पणती रिया वृद्धसेवा निधीसाठी पन्नास हजार रुपयांच्या देणग्या देत आहेत. यंदाही त्यांनी कै. कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

### ५. श्री शिरीष वाघ यांच्यातर्फे संघाला तीन लाख रुपयांची देणगी

आपल्या संघाच्या कार्यकारिणीचे एक सक्रीय सभासद व उपाध्यक्ष श्री शिरीष दिनानाथ वाघ यांना ६ नोव्हेंबर रोजी ७५ वर्षे पूर्ण झाली. याप्रसंगी त्यांनी संघाला तीन लाख रुपयांची भेट दिली आहे. त्यातील दोन लाख रुपये समाजसेवा निधीसाठी आहेत व उर्वरित एक लाख रुपये वृध्दसेवा निधी यासाठी आहेत. शिरिषबाब, देव तुझें बरें करूं. शतायुषी भव.

### संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | पितृपक्षानिमित्त नाडकर्णी कुटुंबीयांकडून | ३००० |
| २. | श्री. रामदास काशीनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सिंधू यांजकडून | २००० |
| ३. | पूर्वजांच्या स्मरणार्थ पितृपक्षा निमित्त श्री. मनोज भांडारकर व कुटुंबीयांकडून | २५०० |
| ४. | पूर्वजांच्या स्मरणार्थ पितृपक्षा निमित्त अनामिकेकडून | ५००० |
| ५. | पूर्वजांच्या पितृस्मरणार्थ श्री देविदास विश्वंभर कसबेकर यांजकडून | १०००० |
| ६. | श्रीमती आशा व श्री वामन सुब्राव वाघ व श्री. पुंडलीक बाळकृष्ण देसाई यांच्या स्मरणार्थ डॉ. सतीश वामन वाघ यांजकडून | ६००००० |
| ७. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २५व्या स्मृति दिना निमित्त त्यांचे पुत्र अजीत यांजकडून | ४००० |
| ८. | श्री. अनील भालचंद्र तेलंग यांच्या जन्मदिना स्मरणार्थ त्यांचे पुत्र पराग यांजकडून | ३०००० |
| ९. | श्री.शिरीष दिनानाथ वाघ यांच्या ७५ व्या वाढ दिवसानिमित्त समाज सेवा निधी साठी | २००००० |

### वृद्ध सेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. विश्वनाथ नागेश नाडकर्णी यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी बंधु श्री. दत्तात्रेय यांजकडून | १०००० |
| २. | श्रीमती शांता व श्री. यशवंत श्रीपती कुलकर्णी व श्रीमती लीला व डेंटिस्ट श्री. गोविंद नारायण नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ तीन नातींकडून | ५००० |
| ३. | श्रीमती इंदू व श्री. सच्चिदानंद अनंत वर्टी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. विवेक यांजकडून | १०००० |
| ४. | श्रीमती स्नेहलता विनायक तेलंग यांच्या ७५ व्या वाढदिवसा निमित्त | ५०००० |



| | | |
|---|---|---|
| ५. | श्रीमती मालती व श्री. दिनकर वामन वर्टी यांच्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती रेखा मिलिंद तेलंग व श्रीमती मीनल सतीश भुजले यांजकडून | ५००१ |
| ६. | श्रीमती मीरा व श्री. गोपाळ सर्वोत्तम तलंग यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र सर्वश्री मिलिंद व निमीष यांजकडून | ५००१ |
| ७. | श्री. सूब्राय विनायक वागळे यांच्या १० व्या पुण्यतिथी निमित्त पत्नी सुजाता यांजकडून | १०००० |
| ८. | श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांच्या दुसऱ्या पुण्यतिथी निमित्त बंधू श्री. अरवींद यांजकडून | ३००००० |
| ९. | श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या स्मरणाप्रित्यर्थ नातू श्री. कवीश दूर्गानंद (मच्छींद्र) कसबेकर, नातसून श्रीमती अरुंधती व पणती रीया कवीश कसबेकर यांच्या कडून | ५०००० |
| १०. | श्री.शिरीष दिनानाथ वाघ यांच्या ७५ व्या वाढ दिवसा निमित्त | १००००० |

### एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. दीपक जगन्नाथ गायतोंडे (निवृत्त चीफ फायर ऑफीसर) यांच्या ७४ व्या वाढदिवसाच्या स्मरणार्थ पुत्र श्री. ओंकार यांजकडून | ५००१ |
| २. | श्री. सच्चिदानंद यशवंत कुळकर्णी यांच्या स्मरणार्थ त्यांच्या तीन कन्यांकडून | ५००० |
| ३. | श्री. मंगेश गोविंद मुजुमदार यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. विनायक यांजकडून | ५००० |
| ४. | श्री अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांच्या दुसऱ्या पुण्यतिथी निमित्त बंधु श्री. अरविंद यांजकड़न | २००००० |
| ५. | श्री. श्रीकांत दत्तात्रय वाघ यांच्या दुसऱ्या पुण्यतिथीच्या स्मरणार्थ पुत्र अमीत यांजकडून | १,२५,००० |
| ६. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २५व्या स्मृतिदिना स्मरणार्थ पुत्र अजीत यांजकडून | २००१ |
| ७. | श्री. अग्र विनायक रेगे यांजकडून एज्युकेशन सोसायटीस | ३००० |

### चुकीची दुरुस्ती


१) एज्युकेशन सोसायटीला मिळालेल्या देणग्यांमध्ये गेल्या मुखपत्रिकेत पान नंबर ३०, नंबर ४च्या देणगीत श्रीमती माधवी मधुकर नाडकर्णी ऐवजी श्रीमती माधुरी मधुकर नाडकर्णी असे वाचावे.

## ।। कालाय तस्मै: नम: ।।

| | नाव | गाव | सध्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | अनिता सुनील ओडक (पूर्वाश्रमीची अनिता अरविंद नाडकर्णी) | मीटबंदर | फिलाडेल्फीया, अमेरीका |
| २. | कुसुम वामन बोरकर | कोडीबाग | दहीसर |
| ३. | अरविंद भालचंद्र दिवेकर | कणसगिरी | मुलुंड |
| ४. | राधाबाई मुकुंद ठोपळे | कारवार | कांदीवली |
| ५. | मधुकर घनश्याम गायतोंडे | अस्नोटी | पुणे |
| ६. | रंजना रमाकांत गायतोंडे | अंकोला | माटुंगा |
| ७. | महेश नारायण हिचकड | अंकोला | पुणे |
| ८. | यशवंत गोविंद कसबेकर | खारगे | कांदिवली |
| ९. | अश्वीनी व्यंकटेश कुळकर्णी (यांनी देहदान केले आहे.) | हळगा | पारले |
| १०. | रमेश गणपत कुळकर्णी | अऊर्से | पारले |
| ११. | शांताराम (हेमंत) नीळकंठ कुळकर्णी | किन्नर | माहीम |
| १२. | कमलाकर माधव मुजुमदार | अंकोला | पुणे |
| १३. | उमेश शेषगिरी नाडकर्णी (यांनी देहदान केले आहे.) | हळगा | नंदव्हाळ |
| १४. | कुसुम सदानंद नाडकर्णी | सांवर पै | कांदीवली |
| १५. | शामसुंदर पांडुरंग (मोहन) नाडकर्णी | अंकोला | दुबई |
| १६. | अनिरुद्ध काशीनाथ नाडकर्णी | मल्लापूर | मंगेशी |
| १७. | अलकनंदा वसंत नाडकर्णी | सांवर पै | कुर्ला |
| १८. | संजीव विश्वेश्वर पिकळे | अंकोला | अंधेरी |
| १९. | ऊषा (कुंदा) अरुण पिंगे | सदाशिवगड | बोरीवली |
| २०. | रमेश यशवंत रामाणी | व्हडले बाग | साकीनाका |
| २१. | सस्मिता (कुंदा) प्रभाकर तेलंग | केरवडी | ठाणे |
| २२. | गुरुदास शंकर तेलंग | हारवाडे | बेंगळुरु |
| २३. | लता दिगंबर वाघ | सदाशिवगड | जोगेश्वरी |
| २४. | आनंद पुरुषोत्तम वाघ | सदाशिवगड | मुलुंड |
| २५. | लक्ष्मीकांत (भानू) वामन वागळे | बाड | बाड |
| २६. | अरुणा भास्कर वागळे | माजाळी | बोरिवली |
| २७. | सतीश उमाकांत वागळे | हाणकोण | खार |
| २८. | भावानीशंकर गजानन वागळे | माजाळी | मालाड |
| २९. | सुनीता भावानीशंकर गजानन वागळे | माजाळी | मालाड |
| ३०. | कल्पना दिनानाथ वागळे | बाड | फोंडा |



Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80



हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक प्र. मो. कसबेकर यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.